**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**

**गुरुवार दिनांक २९ मे २०२५**

**ठळक बातम्या**

1. **विकसित कृषी संकल्प अभियानाला आजपासून देशभरात प्रारंभ, राज्यात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी परभणी इथं केला अभियानाचा शुभारंभ.**
2. **विकसित भारताचं स्वप्न पश्चिम बंगालच्या विकासाशिवाय पूर्ण होऊ शकत नाही, असं पंतप्रधानांच प्रतिपादन.**
3. **गेल्या आर्थिक वर्षात महाराष्ट्रात विक्रमी परकीय गुंतवणूक झाल्याची मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची माहिती.**
4. **आयपीएल क्रिकेट स्पर्धेत आज पहिल्या क्वालिफायर सामन्यात पंजाब किंग्स आणि रॉयल चॅलेंजर्स बेंगळुरु यांच्यात लढत होणार.**

---

**विकसित कृषी संकल्प अभियान**

**केंद्र सरकारच्या कृषि आणि शेतकरी कल्याण तसच ग्रामीण विकास मंत्रालयाच्या वतीने केंद्रीय कृषि आणि शेतकरी कल्याण मंत्री शिवराजसिंह चौहान यांच्या नेतृत्वात आजपासून ते १२ जून दरम्यान देशभरात “विकसित कृषि संकल्प अभियान” राबविण्यात येणार आहे. या राष्ट्रव्यापी अभियानाचा शुभारंभ आज झाला. महाराष्ट्रात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी इथ 'विकसित कृषी संकल्प अभियानाच्या चित्ररथ वाहनाला' हिरवा झेंडा दाखवून शुभारंभ केला. यावेळी मंत्री माणिकराव कोकाटे, राज्यमंत्री मेघना बोर्डीकर, राज्यमंत्री ॲड. आशिष जयस्वाल, वसंतराव नाईक मराठवाडा विद्यापीठाचे कुलगुरू आणि इतर मान्यवर उपस्थित होते. यावेळी बोलतांना देवेंद्र फडणवीस यांनी शेतक-यांच्या संशोधन वृत्तीची दखल घेण्याच आवाहन कृषी विद्यापीठांना केल.**

***(होल्ड बाईट- मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस 38 सेकंद)***

***खरंतर आपल्या विद्यापीठांना माझी विनंती, आपण अनेक शेती क्षेत्रामध्ये पुरस्कार देतो. पण आपले जे शेतकरी शेतीच्या क्षेत्रामध्ये संशोधन करतात अशा***

*किमान 10 शेतकर्यांना त्या ठिकाणी आपण ऍ‍ॅग्रोसायन्टिस्ट  म्हणून दरवर्षी एक पदवी दिली पाहिजे, डेजिग्नेशन  दिला पाहिजे किमान पाच माणसं मला वाटते तेवढी पण सध्या विद्यापीठाने आपापल्या क्षेत्रामध्ये निवडली पाहिजे आणि त्यांना कृषी संशोधक अशा प्रकारचे मानक पदवी ही जर आपण दिली, तर मला असं वाटतं कि त्यांनी जे केलेला आहे त्याला लेजिटिमसी देखील या ठिकाणी मिळेल.*

**हे अभियान राबविण्यासाठी आणि  शेतकऱ्यांचे कल्याण साधण्यासाठी कृषि क्षेत्रात कार्य करणारी देशाची सर्वोच्च संस्था भारतीय कृषि अनुसंधान परिषद परिश्रम घेत आहे. या अभियानामध्ये देशातील ७२३ जिल्हयांमधील ६५,००० पेक्षा जास्त गावांना भेट देण्यासाठी २,१७० तज्ज्ञ पथके सहभागी होणार आहेत. प्रत्येक पथकात किमान चार वैज्ञानिक असतील. या पथकांमध्ये कृषि विद्यापीठांचे वैज्ञानिक, संशोधन संस्थांचे तज्ज्ञ, शासकीय विभागांचे अधिकारी, नाविन्यपूर्ण कार्य करणारे शेतकरी आणि एफपीओचे (**FPO**) कर्मचारी यांचा समावेश असेल. या अभियानाद्वारे देशातील १.३ कोटींपेक्षा अधिक शेतकऱ्यांपर्यंत पोहोचण्याचे लक्ष्य ठेवण्यात आले आहे. महाराष्ट्र राज्यात हे अभियान कृषि विभाग आणि ५० कृषि विज्ञान केंद्रांच्या माध्यमातून ४५०० गावांत राबवले जाणार आहे.**

**---------------------------------------------**

**निधी**

**दरम्यान, परभणी येथे एका कार्यक्रमासाठी आले असताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्पष्ट केलं की लाडकी बहीण योजनेसाठी कुठल्याही विभागाचा निधी पळवण्यात आला नाही किंवा त्यामध्ये कपात करण्यात आली नाही ....**

*(होल्ड बाईट -देवेंद्र फडणवीस 1 मिनिट)*

*आदिवासींच्या लोकसंख्येप्रमाणे आदिवासींकरता आणि अनुसूचित जातीच्या लोकसंख्येप्रमाणे अनुसूचित जातीकरिता निधी राखीव ठेवावा आणि हा निधी राखीव ठेवताना त्यातला जास्तीत जास्त निधी हा वैयक्तिक लाभाच्या योजनांकरिता राखीव ठेवला पाहिजे. आणि मग काही स्पेसिफिक इन्फ्रास्ट्रक्चर करता ठेवला पाहिजे.आता लाडकी बहिण ही योजना वैयक्तिक लाभाची योजना आहे. तर मग लाडक्या बहिणी करता जर तुम्ही निधी दिला, तर तो अर्थसंकल्पच्या नियमाप्रमाणे त्या आदिवासी विभागातच दाखवावा लागेल आणि तो अर्थसंकल्पच्या नियमाप्रमाणे त्या अनुसूचित जाती विभागामध्येच आपल्याला किंवा  सामाजिक न्याय विभागातच  दाखवाव लागेल  त्याप्रमाणे तो दाखवला. पण यासंदर्भातला अजितदादांनी हाऊसमध्ये खुलासा केला कुठलाही पैसा पळवलेला*

*नाही, कुठलाही पैसा वळवलेला नाही नियमांमध्ये अशा प्रकारची तरतूद तिथेचं दाखवावे लागते ते योग्य प्रकारे दाखवलेली आहे. त्यामुळे यात कुठली बनवा बनवी नाही यात कुठली फसवा फसवी नाही हे स्पष्ट मी करू इच्छितो. अजितदादांनी योग्य काम केले आहे हे मी याठिकाणी सांगतो.*

---------------------------------------------

**प्रधानमंत्री दौरा**

**भारतीय अर्थव्यवस्था गॅस आधारित अर्थव्यवस्था बनण्याच्या दिशेने प्रगती करत असून, पर्यावरण रक्षणासाठी ते पूरक ठरेल असं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. ते आज पश्चिम बंगालमध्ये अलीपुरद्वार जिल्ह्यात शहर आधारित गॅस वितरण प्रकल्पाची पायाभरणी करताना बोलत होते. या प्रकल्पासाठी १ हजार १७ कोटी रुपये खर्च झाले असून, पश्चिम बंगालमधल्या अलीपुरद्वार आणि कूचबिहार जिल्ह्यातल्या नागरिकांना त्याचा लाभ मिळेल. या प्रकल्पातून घरोघरी स्वयंपाकाच्या गॅसचा पुरवठा होईल. विकसित भारताचं स्वप्न पश्चिम बंगालच्या विकासाशिवाय पूर्ण होऊ शकत नाही, असं पंतप्रधान यावेळी बोलताना म्हणाले.**

*(होल्ड बाईट- पंतप्रधान नरेंद्र मोदी 22 सेकंद)*

*आज जब भारत विकसित राष्ट्र की ओर बढ़ रहा है तो बंगाल की भागीदारी अपेक्षित भी है और अनिवार्य भी है। इसी इरादे के साथ केंद्र सरकार यहाँ लगातार इंफ्रास्ट्रक्चर, इनोवेशन और इन्वेस्टमेंट को नई गति दे रही है। बंगाल का विकास भारत के भविष्य की नींव है।*

**पंतप्रधान मोदी यांनी आज सकाळी दूरस्थ पद्धतीनं सिक्कीम मधल्या विविध विकास प्रकल्पांचं उदघाटन आणि पायाभरणी केली. सिक्कीम सह ईशान्येकडचा संपूर्ण प्रदेश भारताच्या प्रगतीचा तेजस्वी अध्याय म्हणून उदयाला येत असल्याचं ते यावेळी म्हणाले.पंतप्रधान मोदी सध्या बिहारला पाटणा विमानतळाच्या नवीन टर्मिनल इमारतीचं उद्घाटन कार्यक्रमात उपस्थित आहेत. उद्या कराकट इथं ते विविध विकास प्रकल्पांचं उद्घाटन, पायाभरणी आणि लोकार्पण करतील. त्यानंतर ते उत्तर प्रदेशला भेट देणार असून, कानपूर नगर इथं विविध विकास प्रकल्पांची पायाभरणी आणि उद्घाटन करतील.**

---------------------------------------------

**आंतरराष्ट्रीय योग दिन**

**आंतरराष्ट्रीय योग दिनाच्या तयारी संदर्भात काल नवी दिल्लीत विविध मंत्रालयांमध्ये एक बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीत महत्त्वाच्या**

मंत्रालयांमधील वरिष्ठ अधिकारी, आयुष संस्थेचे पदाधिकारी आणि इतर संबंधित उपस्थित होते. येत्या ११ जून रोजी आंतरराष्ट्रीय योग दिन साजरा करण्यात येणार असून तो आंतरराष्ट्रीय स्तरावर साजरा करण्याच्या तयारी संदर्भात चर्चा करण्यात आल्याचं आयुष मंत्री प्रतापराव जाधव यांनी सांगितलं.

---------------------------------------------

शिष्टमंडळं

सरकार दहशतवादाविरोधातील आपली भूमिका स्पष्ट करण्यासाठी विविध देशांमध्ये सर्वपक्षीय शिष्टमंडळं पाठवली असून भारताची भूमिका स्पष्ट करत आहेत. दरम्यान, काँग्रेसचे खासदार आणि सर्वपक्षीय शिष्टमंडळातील एका शिष्टमंडळाचे प्रमुख असलेल्या शशी थरूर यांनी आता महात्मा गांधींचा देशही कुठलीही घटना घडल्यावर आपला गाल पुढे करणार नाही. तर प्रतिक्रिया देईल, असे म्हटले आहे. पनामा इथं भारतीय दूतावासाने आयोजित केलेल्या कार्यक्रमात शशी थरूर यांनी दहशतवादाविरोधातील भारताचा दृढ निश्चय अधोरेखित केला,

---------------------------------------------

संरक्षण मंत्री राजनाथ सिंह

मेक इन इंडिया हे देशासाठी निर्णायक धोरण असून, जपान प्रमाणे, भारतही भविष्यातल्या तंत्रज्ञानाचं विकास केंद्र बनू शकतो, असं संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी म्हटलं आहे. ते आज नवी दिल्ली इथं CII, अर्थात भारतीय उद्योग महासंघाच्या वार्षिक व्यवसाय परिषदेला संबोधित करत होते. देशाची सुरक्षा आणि समृद्धीसाठी 'मेक इन इंडिया' महत्वाचं असून ऑपरेशन सिंदूर दरम्यान देशवासीयांनी या मोहिमेचं यश अनुभवल्याचं ते यावेळी म्हणाले. भारत आज केवळ लढाऊ विमानं किंवा क्षेपणास्त्र प्रणाली बनवत नसून, नव्या युगाच्या युद्ध तंत्रज्ञानासाठी देखील सज्ज होत आहे असं त्यांनी सांगितलं.

---------------------------------------------

परकीय गुंतवणूक

गेल्या आर्थिक वर्षात महाराष्ट्रात १ लाख ६४ हजार ८७५ कोटी इतकी विक्रमी परकीय गुंतवणूक झाल्याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी दिली. ही गुंतवणूक देशाच्या एकूण गुंतवणुकीच्या ४० टक्के इतकी आहे. त्याआधीच्या आर्थिक वर्षाच्या तुलनेत ही गुंतवणूक ३२ टक्के अधिक आहे, असं मुख्यमंत्र्यांनी सांगितलं. गेल्या आर्थिक वर्षाच्या शेवटच्या तिमाहीत २५ हजार ४४१ कोटी इतकी

परकीय गुंतवणूक आली. राज्याची घोडदौड अशीच सुरू राहील असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. मुख्यमंत्र्यांनी राज्यातल्या जनतेचं अभिनंदनही केलं.

-------------------------------------------------

महाराणा प्रतापसिंह जयंती

नागपूर महानगरपालिकेच्या वतीनं शौर्य आणि स्वाभिमानाचे प्रतीक असलेल्या महाराणा प्रतापसिंह यांच्या जयंती निमित्त त्यांना विनम्र अभिवादन करण्यात आलं. मनपाचे अतिरिक्त आयुक्त अजय चारठाणकर यांच्या हस्ते मनपा मुख्यालयातील दालनात स्थित महाराणा प्रतापसिंह यांच्या तैलचित्राला पुष्प अर्पण करीत अभिवादन करण्यात आले.

-------------------------------------------------

आयपीएल क्रिकेट

आयपीएल क्रिकेट स्पर्धेत आज पहिल्या क्वालिफायर सामन्यात पंजाब किंग्स आणि रॉयल चॅलेंजर्स बेंगळुरु यांच्यात लढत होणार आहे. पंजाब इथे महाराजा यादविंद्र सिंग स्टेडियममध्ये संध्याकाळी साडेसात वाजता या सामन्याला सुरुवात होईल. उद्या होणारा एलिमेनिटर सामना गुजरात टायटन्स आणि मुंबई इंडियन्स यांच्यात खेळवण्यात येणार आहे. तीन जून रोजी स्पर्धेचा अंतिम सामना आहे.

-------------------------------------------------

हवामान

संपूर्ण पूर्व विदर्भातील सर्व जिल्ह्याच्या तुरळक ठिकाणी आज पासून दोन जून पर्यंत विजेच्या कडकडाटासह तसेच सोसाट्याच्या वाऱ्यासह हलक्या ते मध्यम पावसाची शक्यता हवामान खात्याने वर्तवली आहे. पश्चिम विदर्भात आज असेच हवामान राहील. दरम्यान पुढील एका तासात नागपूर वर्धा अमरावती भंडारा जिल्ह्यात मेघगर्जने आणि वादळी वाऱ्यासह हलक्या ते मध्यम पावसाची शक्यता वर्तविण्यात आली आहे.

-------------------------------------------------

प्रकाशन

केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी लिहिलेल्या 'संघातील मानवी व्यवस्थापन' या पुस्तकाचा प्रकाशन सोहळा राजहंस प्रकाशन व मंथन व्यासपीठ यांच्या वतीने उदया ३० मे रोजी आयोजित करण्यात आला आहे. व्हीआयपी रोडवरील वनामती सभागृहात सायंकाळी ६ वाजता हा सोहळा होईल. याप्रसंगी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे अखिल भारतीय प्रचारप्रमुख सुनील आंबेकर

आणि ज्येष्ठ संपादक तथा विचारक विवेक घळसासी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहतील. पुस्तकाचे लेखक गडकरी हेही यावेळी उपस्थित असतील.

-----------------------------------------------